CNR No. **MHGO050007572024**

| | |
|---|---|
| दाखल दिनाक | १९/१२/२०२४ |
| नोंदणी दिनांक | १९/१२/२०२४ |
| निकाल दिनांक | ०१/०४/२०२६ |
| कालावधी | ०१ वर्ष, ०३ महीने, १३ दिवस |

**न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सडक अर्जुनी, जि. गोंदिया यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी पी. एम. काजळे)**

**म. सं. कौ. हिं. का. अर्ज. क्र. १९/२०२४**

**निशाणी क्र.१४**

**प्रिया देवेंद्र राउत,**
वय – २५ वर्ष, धंदा – गृहिणी
हल्ली रा – खोडशिवणी, ता. सडक अर्जुनी,
जि. गोंदिया. ................. अर्जदार

विरुद्ध

१. **देवेंद्र महादेव राउत,**
वय– २८ वर्ष, धंदा– नोकरी,

२. **गुननबाई महादेव राउत,**
वय – ६० वर्ष, धंदा– शेळीपालन,

३. **सोनुबाई नामदेव सोनवाने,**
वय– ३२ वर्ष, धंदा– मंजूरी
सर्व रा.मुंडीपार, ता. गोरेगाव, जि. गोंदिया. ................ सामनेवाला

-----------------------------------------

विधीज्ञ – अर्जदार करिता ॲड. आर. जे. राउत
सामानेवाला क्र १ ते ३ करिता ॲड एकता एस. गणविर

---

म. सं. कौ. हिं. का. अर्ज क्र. १९/२०२४
निशाणी क्र.  १४

# न्यायनिर्णय
## ( पारित दिनाक – ०१/०४/२०२६)

अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारपासून महिलांचे संरक्षण कलम १२ प्रमाणे दाखल केला असून त्यामध्ये कलम १८, १९, २०, २२ अन्वये आदेश मिळावेत म्हणून दाखल केला आहे.

२. **अर्जदारचे अर्जदातील कथन थोडक्यात खालील प्रमाणे आहे –**

अर्जदार व सामनेवाला क्र १ हे पती–पत्नी असून सामनेवाला २ सासु व सामनेवाला ३ ननंद आहे. अर्जदार व सामनेवाला क्र १ यांचा विवाह दिनांक २६/०२/२०२४ रोजी हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे मौजे– खोडशिवनी, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया येथे झाला आहे. सदरचे विवाह संबध अद्याप कायम आहे. विवाहानंतर अर्जदार सामनेवाला यांचेकडे नांदण्याकरिता गेली. अर्जदाराला व सामनेवाला क्र १ पासून अपत्य झालेले नाही. अर्जदार व सामनेवाला यांच्यामध्ये एक महिन्यातच आपसी वैचारिक मतभेद निमार्ण झाले. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र. १ हा तिला लग्नानंतर पासुन उंचीने बुटकी आखुड आहे असे म्हणुन तिला वैवाहिक किंवा शारीरिक सुख कधीही दिले नाही. त्यामुळे अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांच्यामध्ये भांडण होवु लागले. सामनेवाला क्र. १ तिला तु माझे पसंतीची नाहीस, मला तुझे सोबत संसार करायचा नाही, तु माहेरी निघुन जा असे म्हणुन तिला जनावराप्रमाणे मारत होता. तसेच सामनेवाला क्र. १ याने तिला लाथाबुक्क्याने मारहाण केल्याने तिच्या डोक्याला व छातीमध्ये दुखु लागले. परंतु, सामनेवाला क्र. १ याने तिला डॉक्टरकडे नेले नाही. त्यामुळे अर्जदाराला तिचे जीवन सामनेवाला यांच्या घरी धोक्यात असल्याचे भासु लागले. सामनेवाला क्र. ३ ही अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांच्यामध्ये खोटया नाटया गोष्टी सांगुन त्यांच्यात भांडण लावुन तिला मारण्याकरिता सामनेवाला क्र. १ याला प्रेरीत करीत होती. सामनेवाला यांनी अर्जदाराचा

शारिरिक व मानसिक छळ करून तिला माहेरी काढुन दिले. अर्जदार एक महिण्यापासुन माहेरी राहत असतांना सामनेवाला क्र. १ हा तिला घ्यायला आला नाही उलट फोनद्वारे तिला म्हणाला की, आता माझे घरी परत यायचे नाही. त्यामुळे अर्जदाराचे वडीलांनी तिला सामनेवाला याच्या घरी सोडण्यास गेले असता सामनेवाला यांनी त्यांच्यासोबत भांडण केले. त्यानंतर अर्जदाराच्या वडीलांनी मध्यस्थी लोकांची मदत घेवुन सामनेवाला यांची समजुत घातली व वाद शांत केले. त्यावेळी सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराच्या वडीलांना व्यवसाय करण्याकरिता रक्कम रू. ५०,०००/– ची मागणी केली. त्यामुळे अर्जदाराच्या वडीलांनी सामनेवाला क्र. १ याला रक्कम रू. ५०,०००/– दिले. परंतु दोन दिवसांनी सामनेवाला याने अर्जदाराला तु माझे घरी राहायचे नाही म्हणुन जनावराप्रमाणे मारले व तिचा गळा दाबुन मारण्याचा प्रयत्न केला. तसेच तिला घराबाहेर काढले. त्यामुळे अर्जदार हिने वडीलांना फोन करून बोलावले. अर्जदाराचे भाउ याने सामनेवाला क्र. १ याला समजावले परंतु, तो समजण्यास तयार नव्हता व अर्जदाराला माझ्या घरी राहिली तर, मी अर्जदाराचा खुन करीन असे बोलला. त्यामुळे अर्जदाराचा भाउ याने अर्जदाराला माहेरी घेवुन गेला.

३. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, शेवटी अर्जदाराने तंटामुक्त समिती, मुंडीपार यांच्याकडे तक्रार अर्ज केला. तंटामुक्त समितीने अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह वाचविण्यासाठी प्रयत्न केला. परंतु, तिथे देखील समझोता झाला नाही. अर्जदाराला विनाकारण नाईलाजास्तव तिच्या आई–वडीलांच्या घरी राहणे भाग पडले आहे. तिला हलाखीचे जीवन जगावे लागत आहे. सामनेवाला यांनी संगणमत करून अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे व करीत आहे. तिला तिचे पालनपोषणाकरिता स्वत:चे उत्पन्नाचे साधन नाही. त्याउलट सामनेवाला हा सेवा सहकारी सोसायटी, मुंडीपार येथे चपराशी म्हणुन कार्यरत आहे. त्याला महिन्याला रू. ३०,०००/– रू पगार मिळतो. सामनेवाला याच्याकडे शेळी पालनाचा व्यवसाय देखील आहे. त्यामुळे तो नोकरी व शेळीपालन व्यवसाय मधुन

वर्षाकाठी रू. ६,००,०००/– कमवितो. सामनेवाला क्र १ वर अर्जदार व्यतिरिक्त कुणाचीही पालन–पोषणाची जबाबदारी नाही. या सर्व कारणास्थव तिने सामनेवाला यांचेकडून दरमाह पोटगी म्हणून रक्कम रु. ७,०००/–, तसेच कायमस्वरूपी रक्कम रू. ५,००,०००/– व लग्नाला लागलेला खर्च रक्कम रू. ३,००,०००/– व वडीलांचे रक्कम रू. ५०,०००/–, तिच्या रहिवास सोय करण्याचे आदेश व्हावे अशी मागणी केली आहे.

०४. सदर प्रकरणात सामनेवाला क्र ०१ ते ०३ यांना समन्स बजावणी होऊन ते हजर झाले, परंतु वारंवार संधी देवुनदेखील त्यांनी त्यांची कैफियत प्रकरणात दाखल केली नाही. त्यामुळे प्रकरण विना कैफियत चालविण्यात आलेला आहे.

०५. अर्जदाराचे पक्षकथनात खालील वाद मुद्दे विचाराधीन येतात. त्या अनुषंगाने निष्कर्ष त्यांच्या समोर खालील करणंमीमांसेसह नोंदवण्यात आले आहे.

| **अ. क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे शाबीत करते काय की, सामनेवाला यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे? | नाही |
| २. | अर्जदार ही मागीतल्याप्रमाणे रहिवासचा आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | नाही |
| ३. | अर्जदार मागीतल्याप्रमाणे पोटगीचा आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| ४. | अर्जदार मागीतल्या प्रमाणे नुकसान भरपाईचे आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | नाही |
| ५. | आदेश काय? | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |

## पुरावा

०६. अर्जदारने तिच्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ तिचे निशाणी क्र १० वर तिचे दायित्व व मालमताचे शपथपत्र दाखल केले असून निशाणी क्र ११ वरील सरतपासाचे शपथपत्राचे आधारे साक्ष नोंदवून निशाणी क्र १३ वरील पुरसिस प्रमाणे पुरावा बंद केला आहे. तोंडी पुराव्या व्यतिरिक्त तिने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

०७. अर्जदार तर्फे विद्वान वकील श्रीमती आर. जे. राउत यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी मागणीप्रमाणे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र १ ते ४ करिता –**

मुद्दा क्र १ ते ४ हे एकमेकांशी सलग्न आहे. त्यामुळे मुद्दा क्र १ ते ४ यांची कारणमीमांसा एकत्र करण्यात येते.

०८. या पार्श्वभूमीवर या साठी सर्वप्रथम कौटुंबिक सबंध म्हणजे काय यांची सदर कायद्याच्या कलम २ मध्ये दिलेली व्याख्या पाहणे आवश्यक आहे. सदर तरतुदीप्रमाणे कौटुंबिक सबंध म्हणजे दोन व्यक्तिमधील सबंध जे एकाच घरात राहतात किंवा आधी राहिलेले असतील, जे शारीरिक, वैवाहिक सबंधमुळे किवा लग्नासारख्या संबंधामुळे जुळले गेले आहेत. सदर संबंधामध्ये संयुक्त कुटुंबात राहणाऱ्या महिला व इतर नातेवाईक देखील समावेश करण्यात आलेला आहे.

०९. तदनंतर या ठिकाणी कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय याचे देखील व्याख्या पाहणे व समजून घेणे आवश्यक आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरक्षण अधिनियम २००५ च्या कलम ३ मध्ये कौटुंबिक हिंसाचाराची सखोल व्याख्या करण्यात आलेली आहे.

सदर व्याखेमध्ये कौटुंबिक हिंसाचार म्हणजे अशी कोणतीही कृती किवा वर्तन ज्यामुळे पीडित व्यक्तीला शारीरिक, मानसिक, लैंगिक, मौखिक, भावनिक अथवा आर्थिक छळ अथवा त्रास होत असेल. सदर व्याखेमध्ये विविध प्रकारे होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचारला स्थान दिलेले असले तरी सदर कलमाच्या स्पष्टीकरणामध्ये खरोखरच अशा प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार स्थान दिलेले असले तरी सदर कलंयच्या स्पष्टीकरणामध्ये खरोखरच अशा प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार घडला आहे किंवा नाही या निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी संबंधीत प्रकरणातील एकंदर परिस्थिति व सर्व तथ्याचा विचार करणे गरजेचे आहे.

१०. त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणात अर्जदार हिच्या सरतापासाच्या शपथपत्रा व्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा उपलब्ध नाही. तिने तिच्या अर्जामध्ये व शपथपत्रामद्धे सामनेवाला क्र. १ याचेसोबत तिचा विवाह झालेला आहे. तिचे विवाहची पत्रीका तिने अभिलेखावर दाखल केलेली आहे. अर्जदारला लग्न झालेपासून मूलबाळ झाले नाही म्हणून व त्यानंतर विविध कारणावरून तसेच पैशाची मागणी करून मानसिक व शारीरिक त्रास देण्यास सुरुवात केल्याचे कथन केले आहे. तथापि या ठिकाणी हे नमूद करणे अत्यावश्यक आहे की, अर्जदाराने तिच्या संपूर्ण अर्जात व शपथपत्रात कोणतीही घटना कधी घडली याबाबतचा कोणताही स्पष्ट खुलासा केलेला नाही. तसेच अर्जदार हिने सामानेवाला यांनी रक्कम रू. ५०,०००/– घेतल्याचे व तिला मारहाण केल्याचे कथन केले आहे. परंतु तिचे वडीलांकडुन रक्कम किती तारखेला व कोणाच्या समक्ष दिले याबाबत तिने पुरावा दिलेला नाही. तिने तिला मारहाण झाल्याबाबत वैदयकीय उपचार घेतले होते. याबाबात देखील तिने तिचे वैदयकीय प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरच्या सर्व कथनामद्धे कौटुंबिक हिंसचारच्या तथाकथित घटनेबाबत अर्जदाराने केवळ मोघम कथन केले आहे.

११. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदाराने तिच्या अर्जात व शपथपत्रात कथन केल्याप्रमाणे तिच्या सोबत कौटुंबिक हिंसाचाराची कोणती घटना घडली असावी असा निष्कर्ष

काढण्याइतपत कोणताही परिस्थितिजन्य पुरावा देखील समोर येत नाही. तथापि तिच्या अर्जात व पुराव्यातील कथनानुसार हे सुस्पष्ट होते की, अर्जदार व सामनेवाला क्र १ यांचे पती–पत्नीचे नाते कायम असतानाही ते एकमेकापासून विभक्त राहत आहेत व अशा विभक्त राहण्यास त्यांचे आपापसातील वाद कारणीभूत आहेत.

१२. वर चर्चिल्याप्रमाणे अर्जदारचा कौटुंबिक हिंसाचार झाला असा निष्कर्ष काढण्याइतपत कोणताही परिस्थितीजन्य पुरावा उपलब्ध नसल्यामुळे विचाराधीन मुद्दा क्र १ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे अर्जदाराने मागीतलेला व राहिवासचा व नुकसान भरपाई आदेश मिळण्यास ती पात्र ठरत नाही. त्या अनुषंगाने विचाराधीन मुद्दा क्र २ व ४ ला देखील नकारार्थी निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे. परंतु, तिला विनाकारण स्वत: च्या आई–वडीलांच्या घरी राहावे लागत आहे. याकरिता तिला रहिवास खर्च देणे न्यायोचित होईल.

१३. तथापि, वर चर्चिल्याप्रमाणे अर्जदार व सामनेवाला क्र १ यांचे आपसातील पती–पत्नीचे नाते कायम असताना देखील ते एकमेकपासून विभक्त राहत आहेत. ही बाब स्पष्ट आहे. अशा परिस्थीतीत पती या नात्याने अर्जदारचा सांभाळ करण्याची कायदेशीर व सामाजिक जबाबदारी ही सामनेवाला क्र १ याचीच आहे. त्यामुळे अर्जदारही सामनेवाला क्र १ याच्याकडून पोटगी मिळण्यास पात्र ठरते.

१४. या ठिकाणी अर्जदारणे तिच्या अर्जात व शपथपत्रात सामनेवाला क्र १ हा सेवा सहकारी सोसायटी, मुंडीपार येथे चपराशी म्हणुन कर्तव्यावर आहे, त्यातून त्याला महिन्याला ३०,०००/– रुपये मिळते. याप्रमाणे महिन्याकाठी रक्कम रु.३०,०००/– मात्र मिळते तसेच त्याला शेळीपालन मधुन रक्कम रू. ३,००,०००/– प्रती वर्ष मिळतात असे कथन केले आहे. त्या अनुषंगाने अर्जदाराने तिच्या तोंडी शब्दाव्यतीरिक्त इतर कोणताही पुरावा याकामी

दिलेला नाही. अशा परिस्थितीत कोणत्याही पुराव्याशीवाय अर्जदाराने कथन केल्याप्रमाणे सामनेवाला क्र. १ याचे उत्पन्न ग्राहय धरणे कदापिही न्यायोचित ठरणार नाही. तथापि, सामनेवाला क्र. १ याचे वय पाहता तो शारिरिकदृष्टया सक्षम शरीरयष्टीचा इसम आहे असे दिसुन येते. त्यामुळे तो शारिरिक कष्ट करून देखील उत्पन्न मिळवु शकतो व स्वत: चा व त्याचेवर अवलंबुन असणा–या व्यक्तीचे पालन–पोषन निश्चितच करू शकतो.

१५. त्या अनुषंगाने अर्जदारने पोटगी दरमाह रु. ७,०००/– मात्र पोटगीची मागणी केलेली आहे. तरी पोटगीची रक्कम ठरवताना उभयपक्षकाराचा आर्थिक व सामाजिक दर्जा व त्यांच्या दैनंदिन गरजा या बाबी देखील विचारात घेणे आवश्यक ठरते. एकंदरीत पुरावा व भौतिक दैनंदिन जीवनाची परिस्थितिवरून सामनेवाला क्र १ याने अर्जदाराला दरमाह रक्कम रु. ७,०००/– मात्र( सात हजार मात्र ) पोटगी देणे न्यायोचित ठरेल. त्या अनुषंगाने न्यायाचा समतोल बाळगण्यासाठी विचाराधीन मुदा क्र ३ ला निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे. वरील सर्व चर्चेअंती मुद्दा क्र. ५ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. याद्वारे सामनेवाला क्र १ यास असे निर्देशित करण्यात येते की, त्याने प्रस्तुत अर्जाच्या दाखल तारखेपासून अर्जदारला दरमाह रक्कम रु. ७,०००/– मात्र ( रु. सात हजार मात्र) द्यावेत.

३. अर्जदारला सामनेवाला क्र. १ याने या अर्जाचे खर्चापोटी रक्कम रु. २०००/– मात्र (रु. दोन हजार मात्र) द्यावेत.

४. अर्जदारला तिच्या रहिवासाकरिता घरभाडे दरमहा रक्कम रू. ३०००/– मात्र प्रस्तुत आदेशाच्या तारखेपासुन द्यावेत.

म. सं. कौ. हिं. का. अर्ज क्र. १९/२०२४
निशाणी क्र. १४

४. अर्जदारच्या सामनेवाला क्र २ ते ३ यांच्या विरुद्धच्या अर्ज व नुकसान भरपाई आदेशाच्या मागण्या नामंजूर करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत आदेशाची एक प्रत उभयपक्षकरना विनामूल्य देण्यात यावी.

Digitally signed by PRIYANKA MACHINDRA KAJALE
Date: 2026.04.01 18:21:53 +0530

**ठिकाण – सडक अर्जुनी** **( पी. एम. काजळे)**

**दिनांक – ०१/०४/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सडक अर्जुनी**

म. सं. कौ. हिं. का. अर्ज क्र. १९/२०२४
निशाणी क्र. १४

**<u>दाखला</u>**

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | राहुल दिगंबर भुजाडे<br>लघुलेखक (श्रेणी–३), |
| न्यायालयाचे नाव | – | दिवाणी व फौजदारी न्यायालय, सडक अर्जुनी, |
| आदेश/न्यायनिर्णय जाहीर केल्याचा दिनांक | – | ०१.०४.२०२६ |
| मा. पिठासिन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याचा दिनांक | – | ०१.०४.२०२६ |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | ०१.०४.२०२६ |